महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail : dydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

**जा.क्र./उमाशि-४०१/११ वी ऑनलाईन २०-२१/पुवि/२०**
**दिनांक :- ०१.०७.२०२०.**

प्रति,

सर्व प्राचार्य/मुख्याध्यापक,
**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र**
**सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये (सर्व).**

**विषय:-इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२०-२१.**
**उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय रजिस्ट्रेशनबाबत**

**संदर्भ:-१) शासन निर्णय क्रमांक-प्रवेश-२०१८/प्र.क्र.३३३/एसडी-२ दि.२३.०६.२०२०.**
**२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म रा पुणे यांचे पत्र जा.क्र. विद्या ए-१/११.प्रवेश/२०२०/१५०१ दि.३०.०६.२०२०.**

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयानुसार आपणांस सूचित करण्यात येते की, सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षी पुणे व पिंपरी महानगरपालिका क्षेत्रात इ.११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत.

सन २०१९-२० मध्ये इ.११वी ऑनलाईन प्रवेशासाठी उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे रजिस्ट्रेशन/करण्यात आलेले होते. पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात सर्व कनिष्ठ महाविद्यालयांच्या इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे लॉगीन आयडी व पासवर्ड सन २०१९-२० मध्ये रजिस्ट्रेशन केलेल्या माहितीतील आपल्या रजिस्ट्रर्ड भ्रमणध्वनीवर दि.०१.०७.२०२० पासून पाठविण्यात येणार आहेत. रजिसट्रर्ड भ्रमणध्वनीवर प्राप्त झालेला लॉगीन आयडी व पासवर्ड च्या सहाय्याने Login करावे. सन २०२०-२१ या वर्षाच्या इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या माहितीमध्ये काही बदल असल्यास तो बदल आपल्यास्तरावरुन करुन घेण्यासाठी इ.११ वी ऑनलाईन प्रवेशाचे https://pune.11thadmission.org.in हे संकेतस्थळ सुरु झालेले आहे.

राज्यात कोविड-१९ या रोगाचा प्रादुर्भाव लक्षात घेता, यावर्षी कनिष्ठ महाविद्यालयाचे रजिस्ट्रेशन ऑनलाईन पूर्ण करणे तसेच या वर्षीच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये झालेल्या बदलांची माहिती देण्यासाठी झोननिहाय ऑनलाईन प्रशिक्षणाचे आयोजन खालील प्रमाणे **meet.google.com/kda-zhzf-kqw** या लिंकद्वारे केलेले आहे.

| अ.क्र. | झोन क्रं. | झोनचे नांव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | १<br>२<br>४ | पुणे शहर मध्य<br>कर्वेरोड, कोथरुड, वारजे<br>सिंहगड रोड | दि.०२.०७.२०२० | सकाळी ११.०० वाजता |



Scanned with CamScanner

| अ.क्र. | झोन क्रं. | झोनचे नांव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| २ | ३<br>५<br>६ | पर्वती-स्वारगेट-कात्रज<br>पुणे-कॅम्प-येरवडा<br>हडपसर-कोंढवा-खराडी | दि.०३.०७.२०२० | सकाळी ११.०० वाजता |
| ३ | ७<br>८<br>९ | शिवाजीनगर-औंध-पाषण-खडकी<br>पिंपरी-सांगवी-भोसरी<br>चिंचवड-आकुर्डी-निगडी | दि.०३.०७.२०२० | दुपारी २.०० वाजता |

उपरोक्त वेळेतच संबधितांनी ऑनलाईन प्रशिक्षणासाठी उपस्थित रहावे. ही मिटिंग फक्त कनिष्ठ महाविद्यालये रजिस्ट्रेशनसाठी असल्याने केवळ कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य/टेक्नीकल पर्सन यांनीच सहभागी व्हावे. (माध्यमिक शाळांसाठी स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात येईल.)

(मीना शेंडकर)
सचिव,
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा.शिक्षण संचालक,
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१.

२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ) महाराष्ट्र राज्य पुणे-१.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवानाः-**

३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.पुणे /जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पुणे / शिक्षणाधिकारी (माध्यमिक व तांत्रिक) पुणे महानगरपालिका, पुणे/ यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या माध्यमिक सलग्न उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेबाबत कळविण्यात यावे.

Scanned with CamScanner